ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ३१ ऑगस्ट, १९५५ | अंक ३५

## विविध माहिती

**खताची वाढती मागणी**—भारतीय सरकारचे शेतकी मंत्री श्री. पंजाबराव देशमुख ह्यांनीं लोकसभेंत अशी माहिती सांगितली, कीं देशांतील शेतकऱ्यांकडून खताची मागणी सारखी वाढती आहे. त्यामुळें सिंद्री येथील कारखान्यांत तयार होणारें खत जमेस धरून सुद्धां भारताला आणखी तीन-चार वर्षें परदेशांतून खत आयात करावें लागेल.

**कॅनडाची भारताला मदत**—भारताच्या ग्रामीण भागांत विजेचा पुरवठा करण्यासाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रींपैकीं ३० लाख डॉलर्सची यंत्रसामुग्री पुरविण्याचें कॅनडाच्या सरकारनें कबूल केलें आहे. ही यंत्रसामुग्री स्वीकारण्याचें भारतीय सरकारनें मान्य केलें असून ती निरनिराळ्या राज्यांना वाटून देण्यांत येणार आहे.

**रबराच्या मळेवाल्यांना मदत**—भारतामधील रबराच्या मळेवाल्यांना आर्थिक मदत देण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें तयार केली आहे. पूर्वी लागवडीखालीं असलेल्या पण हल्लीं ओसाड पडलेल्या ७०,००० एकर जमिनींत नवीन प्रकारचीं रबराचीं झाडें लावण्यांत येणार असून शिवाय १०,००० एकरांत नव्यानें रबराची लागवड करण्यांत येणार आहे. योजना १० वर्षें मुदतीची आहे.

**कागदाची नवी गिरणी**—मेट्टुपलायम् ह्या ठिकाणीं कागदाची नवी गिरणी काढण्यांत यावी असा आग्रह कोइमतूर येथील नागरिकांनीं धरला आहे. गिरणीला ३·१२ कोटी रुपये भांडवल लागेल. अशीच मागणी निलगिरीच्या नागरिकांकडूनहि करण्यांत येत आहे. पण मेट्टुपलायम् ह्या ठिकाणीं मजुरी स्वस्त आहे.

**परदेशी कंपन्यांतील हिंदी नौकर**—भारतांत व्यापारधंदा करण्याच्या परदेशी कंपन्यांत नौकरी करणाऱ्या लोकांसंबंधीं कांहीं आंकडेवार माहिती नुकतीच लोकसभेंत सांगण्यांत आली. १ जानेवारी १९५४ ह्या दिवशीं ३०० रुपये अगर त्यापेक्षा अधिक पगार मिळविणाऱ्या अशा हिंदी लोकांची संख्या १८,६४२ होती ती १ जानेवारी १९५५ रोजीं २१,९०४ इतकी झाली. ह्याच काळांत परदेशीय नौकरांची संख्या ७,७५० वरून ७,५८७ वर आली.

**पाकिस्तानसाठी मोटारट्रक्स**—१ जानेवारी, १९५६ पासून पाकिस्तानमध्यें वाहनांची वाहतूक रस्त्याच्या उजव्या बाजूनें सुरू होणार आहे. अशा वहातुकीसाठी लागणाऱ्या डाव्या बाजूला सुकाणूचें चाक असलेल्या मोटारट्रक्स पाकिस्ताननें मागविल्या होत्या. त्यांपैकीं कांहीं गाड्या लवकरच पाकिस्तानांत येतील. त्या लेलंड ह्या ब्रिटिश कारखान्यानें बनविलेल्या आहेत.

**विलासी मोटारगाड्यांना बंदी**—पॅराग्वेच्या सरकारनें भव्य व विलासी मोटारगाड्यांच्या आयातीवर बंदी घातली आहे. २,५०० डॉलर्सपेक्षा अधिक किंमत पडणाऱ्या कोणत्याहि गाड्या ह्यापुढें देशांत येऊं दिल्या जाणार नाहींत. त्यापेक्षा थोड्या कमी किंमतीच्या गाड्यांनाहि खास परवाना लागेल.

**खेळाडूंच्या खर्चासाठी शब्दकोडें**—पुढील वर्षी मेलबोर्नें येथें भरणाऱ्या जागतिक खेळांच्या सामन्यांत भाग घेण्यासाठी अमेरिका आपला संघ पाठविणार आहे. खेळाडूंचा खर्च भागविण्यासाठीं अमेरिकेच्या ऑलिंपिक कमिटीनें शब्दकोड्याची स्पर्धा लावून १०,००,००० डॉलर्स जमा करण्याचें ठरविलें आहे. बक्षिसाची रक्कम ७०,००० डॉलर्स ठेवण्यांत येणार आहे.

**भद्रावती येथील कारखाना**—भद्रावती येथील म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्सचें रूपांतर लवकरच भारत सरकारच्या मालकीच्या कॉर्पोरेशनमध्यें करण्यांत येणार आहे असें समजतें. त्याचप्रमाणें, कारखान्याचा विस्तार करण्याचेंहि घाटत आहे. त्यासाठी २३१ लाख रुपयांचें भांडवल लागेल.

**काश्मीरमध्यें उद्योगविनिमय केंद्र**—काश्मीर सरकारनें राज्यांत लवकरच एक उद्योग विनिमय केंद्र काढण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील सर्व कसबी अगर बिनकसबी जागा ह्यापुढें केंद्रातर्फे भरण्यांत येणार आहेत. काश्मीर सरकार ह्या बाबतींत भारतीय सरकारचा सल्ला घेत आहे.

**नवीन संगीत कलाकारांचा शोध**—येत्या नोव्हेंबर महिन्यांत अखिल भारतीय रेडियोतर्फे कर्नाटकांत हिंदुस्थानी व कर्नाटकी संगीताची स्पर्धा भरविण्यांत येणार आहे. नवीन होतकरू कलावंतांचा शोध लावण्याचा स्पर्धेचा हेतु आहे. स्पर्धकांचें वय १६ ते २१ च्या दरम्यानच राहणार आहे.

**दक्षिण भारतांत पोलादाचा कारखाना**—दक्षिण भारतांत सालेम जिल्ह्यांत चांगल्या प्रतीची लोखंडमिश्रित माती विपुलतेनें सांपडते. तिचा फायदा घेण्यासाठी दक्षिण भारतांत पोलादाचा कारखाना काढण्याचा विचार भारतीय सरकार करीत आहे. पण दक्षिण अरकाट जिल्ह्यांत सांपडणारा कमी प्रतीचा कोळसा कारखान्यांत कसा वापरतां येईल, ह्या प्रश्नावर पोलादाचा कारखाना निघणें, न निघणें अवलंबून आहे.

**विमान कंपन्यांच्या उत्पन्नांत वाढ**—भारतीय विमान-कंपन्यांनीं मालाच्या व उतारूंच्या वहातुकीचे दर वाढविल्यामुळें त्यांच्या उत्पन्नांत १२·७५ लाख रुपयांची भर पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ही वाढ जुलै, १९५५ ते मार्च, १९५६ हा काळ जमेस धरून अंदाजलेली आहे.

## राज्य सरकारांची यशस्वी कर्जउभारणी

खाली दिलेल्या राज्य सरकारांच्या कर्जांत भरणा करण्यासाठी आलेल्या रकमांचा तपशील पुढीलप्रमाणें आहे.

| | रोख रकमा (रु.) | रूपांतरित कर्जाच्या रूपानें भरणा (रु.) | एकूण (रु.) |
|---|---|---|---|
| आंध्र | ४,८३,०९,३०० | | ४,८३,०९,३०० |
| मध्यप्रदेश | १,११,३७,२०० | ३३,४७,३०० | १,४४,८४,५०० |
| म्हैसूर | २,७७,१५,३०० | ७५,८७,६०० | ३,५३,०२,९०० |
| सौराष्ट्र | २,६०,६२,८०० | — | २,६०,६२,८०० |
| उत्तरप्रदेश | ६,७७,६२,००० | — | ६,७७,६२,००० |
| प. बंगाल | ५,५८,३०,८०० | — | ५,५८,३०,००० |

प. बंगाल व उत्तरप्रदेश सरकारांच्या कर्जरोख्यांसाठी मागणी केलेल्यांना त्यांच्या मागणीइतक्या रकमेचे कर्जरोखे देण्यांत येतील.

आंध्र, मध्यप्रदेश, म्हैसूर व सौराष्ट्र सरकारांच्या कर्जरोख्यांसाठी ५,००० रु. रोख रकमा भरलेल्या सर्वांना तसेंच, मध्यप्रदेश व म्हैसूर सरकारांच्या कर्जाच्या बाबतींत पूर्वींचे कर्जरोखे बदलून नवे कर्जरोखे मिळण्यासाठी अर्ज केलेल्या सर्वांना त्यांच्या मागणीइतक्या रकमेचे कर्जरोखे देण्यांत येतील. वरील चारीहि कर्जांच्या बाबतींत ५००० रु. हून अधिक रकमेचे कर्जरोखे, मिळण्याबद्दल अर्ज केलेल्यांना पुढील प्रमाणांत परंतु किमान ५,००० रु. रकमेचे कर्जरोखे देण्यांत येतील..

मागणीच्या किती प्रमाणांत कर्जरोखे देण्यांत येतील हें खाली दिलें आहे.

| | |
|---|---|
| आंध्र | ५५ टक्के |
| मध्यप्रदेश | ७० टक्के |
| म्हैसूर | ८० टक्के |
| सौराष्ट्र | ८५ टक्के |

---


### राज्य सरकारांकडून दुसऱ्यांदा कर्जउभारणी

नुकत्याच विक्रीस काढलेल्या ४ टक्के दराच्या व १९६७ मध्यें परतफेड करावयाच्या, राज्यांच्या कर्जरोख्यांना बरीच मागणी असल्यानें आंध्र, मध्यप्रदेश, मुंबई, म्हैसूर, सौराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि प. बंगाल या राज्य सरकारांनीं भारत सरकारच्या संमतीनें दुसऱ्यांदा कर्जरोख्यांचीं विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. या कर्जाचा भरणा रोख रकमेंत वा चेकच्या स्वरूपांत २० ऑगस्ट ते १ सप्टेंबर १९५५ या मुदतींत रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व बंगळूर येथील कचेऱ्यांत आणि स्टेट बँक ऑफ इंडियाच्या त्या त्या राज्यांतील कर्जाची विक्री करणाऱ्या शाखांत स्वीकारण्यांत येईल. मात्र म्हैसूर राज्य-सरकारच्या कर्जाचा भरणा म्हैसूर राज्यांत बँक ऑफ म्हैसूर लि. च्या शाखांत स्वीकारण्यांत येईल. या राज्य सरकारांनीं उभारलेल्या कर्जाची रक्कम व त्यांच्या कर्जरोख्यांची किंमत पुढीलप्रमाणें आहे :—

| राज्य सरकार | कर्जाची रक्कम | विक्रीची किंमत % |
|---|---|---|
| १. आंध्र | २०० लक्ष रु. | रु. ९९-८-० |
| २. मुंबई | ३०० लक्ष रु. | रु. १००-४-० |
| ३. मध्यप्रदेश | ५० लक्ष रु. | रु. ९९-८-० |
| ४. म्हैसूर | ५० लक्ष रु. | रु. ९९-०-० |
| ५. सौराष्ट्र | १२५ लक्ष रु. | रु. ९९-०-० |
| ६. उत्तरप्रदेश | २५० लक्ष रु. | रु. ९९-८-० |
| ७. प. बंगाल | २०० लक्ष रु. | रु. १००-०-० |


किर्लोस्कर

शेंगायंत्रें



कल्याण शेंगायंत्र

कल्याण पॉवर शेंगायंत्र चालविण्यास ६-८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दर एक तासास ७५-८० पोतीं शेंग फोडली जाते.

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ९,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. ३१ ऑगस्ट, १९५५





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बँका व त्यांचे नोकर ह्यांच्या तंट्याचा शेवट

### गजेंद्रगडकर निवाड्यास सरकारची मान्यता

बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमध्यें गेलीं सात वर्षें चालू असलेला तंटा गजेंद्रगडकर कमिशनचा अहवाल व त्यावरील सरकारचा निर्णय, ह्यामुळें एकदाचा कायमचा मिटेल आणि बँकांची उपयुक्तता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें प्रगतीचीं पावलें पडतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत येत आहे. सेन अवार्ड बेकायदेशीर ठरविण्यासाठीं कित्येक बँका सुप्रीम कोर्टाकडे गेल्या, व त्यांनीं तांत्रिक दृष्टीनें यशहि मिळविलें. पण तें यश अत्यंत महागांत पडलें असेंच बँकांना वाटूं लागलें असलें पाहिजे. सेन अवार्डला सरकारनें कायदेशीरपणा प्राप्त करून दिला असता तर लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या दीर्घगामी चौकशी, त्याचा निवाडा, त्या निवाड्यांत सरकारनें केलेला फेरफार, ह्या सर्वांची आवश्यकताच निर्माण झाली नसती.

गजेंद्रगडकर कमिशनच्या निवाड्यास सरकारनें पूर्णपणें मान्यता दिलेली आहे. 'अ,' 'ब' आणि कांहीं किफायतशीर 'क' वर्गीय बँकांचे बाबतींत गजेंद्रगडकर कमिशननें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या शिफारशींना उचलून धरलें आहे. 'क' आणि 'ड' वर्गीय बँकांचे बाबतींत बऱ्याच दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत. कांहीं बाबतींत गजेंद्रगडकर कमिशननें सुचविलेल्या दुरुस्त्या लक्षांत घेतल्या, तर ट्रायब्यूनलच्या अवार्डमध्यें बदल करण्याचा अधिकार सरकारला असणें कसें आवश्यकच आहे, हें स्पष्ट दिसून येतें. ३०,००० लोकवस्तीपेक्षा लहान ठिकाणच्या बँकांना इतर बँकांपेक्षा वेगळें वागविण्याच्या आवश्यकतेचे बाबतींत कमिशनचें व सरकारचें एकमत आहे. त्यांतील कांहीं तपशिलांत मात्र कमिशनचें सरकारी निर्णयाशीं एकमत झालेलें नाहीं, ही गोष्ट वेगळी. येत्या कांहीं वर्षांत बँकांची प्राप्ति काय राहील ह्याच्या अंदाजावर कमिशनचा निवाडा मुख्यतः आधारलेला आहे. कमिशनला बँकांचे १९५४ अखेरचे व जून, १९५५ अखेरचे आंकडे उपलब्ध होते. तथापि, १९५४ सालीं सरकारला उपलब्ध असलेल्या आंकड्यांवरूनहि सरकारला वेगळा निर्णय घेतां आला असता, असा कमिशनचा अभिप्राय आहे.

बँकांचे व्यवहार वाढत जात आहेत व त्यांचे नफेहि सुधारत जातील, अशी कमिशनची अपेक्षा आहे. तथापि, बँकांनीं कर्जावर ज्यास्त व्याज आकारून उत्पन्न वाढवावें व ठेवींवर द्यावयाच्या व्याजाचे कमाल दर निश्चित करावे, ही कमिशनची वैशिष्ट्यपूर्ण शिफारस त्याच्या कक्षेबाहेरची आहे, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. ही शिफारस त्यानें केली नसती, तरी कांहीं बिघडलें नसतें. कारण, बँकांना योग्य त्या मार्गाचा अवलंब करावाच लागला असता. पुष्कळ शाखा असणाऱ्या मोठ्या बँकांचा खर्च वाढणार असला, तरी गेल्या कांहीं वर्षांत बँकांनीं अगोदरच अपेक्षित अंतिम निर्णयाप्रमाणें कांहीं पावलें टाकलेलीं आहेत व त्यांना आतां फार मोठा नवीन धक्का बसणार नाहीं. अवार्डमुळें गिऱ्हाइकांवरील बोजा मात्र थोड्यातरी प्रमाणांत वाढल्याविना रहाणार नाहीं. परंतु, बँकांची कार्यक्षमता व सेवा सुधारली तर तंट्याच्या वाटाघाटींतून चांगलेंच निघालें असें होईल. कमिशनच्या शिफारसींचा १ एप्रिल, १९५४ पासून नोकरांना फायदा मिळेल. त्या व इतर शिफारसींच्या अंमलबजावणीसाठीं जरूर तें बिल लवकरच मांडण्यांत येईल.

गजेंद्रगडकर कमिशनला काळ अनुकूल होता व त्यामुळें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या निवाड्यास अनुकूल असा त्याला अभिप्राय देतां आला, हें नमूद करणें इष्ट आहे. १९५४ मधील अनुकूल परिस्थिति येतीं तीन वर्षें टिकून राहील ह्याविषयीं बँकर्स व नोकर ह्यांत एकमत होतें. त्यामुळें बँकांना जादा खर्च सोसणें अवघड जाणार नाहीं व तो एकदां पचनीं पडून गेल्यावर बँकिंगची इमारत त्या पायावरच वाढविली जाईल. फार पुढचा विचार करून, पगार व भत्ते ह्यांच्याबाबत निर्णय घेणें तर्कशुद्ध नाहीं, हें कमिशनचें मत समजा जरी पटलें नाहीं, तरी हिंदी बँकांचें भवितव्य उज्ज्वल असल्याचें तूर्त स्पष्ट दिसत असल्याकारणानें, दूरगामी परिणामांचा विचार केला तरी गजेंद्रगडकर कमिशनच्या शिफारसी अव्यवहार्य ठरणार नाहींत, असें आज म्हणतां येईल.

---

## भारतीय उद्योगपतींना सल्ला

युनायटेड स्टेट्स चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष डॉ. क्लेमंट डेव्हिस हे अमेरिकन सरकारच्या विनंतीवरून न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, भारत आणि पाकिस्तान ह्या देशांचा दौरा करीत आहेत. उत्तर-प्रदेश मर्चंटस चेंबर ह्या संस्थेतर्फे कानपूर येथें त्यांचें नुकतेच स्वागत करण्यांत आलें. त्या प्रसंगीं बोलतांना मि. डेव्हिस म्हणाले कीं, भारताच्या उद्योगधंद्यांचें भवितव्य आशादायक आहे असें मला वाटतें. भारतीय उद्योगपतींनीं संशोधनासंबंधीं सध्यापेक्षा अधिक आस्था दाखविली पाहिजे. त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांत नवीन उत्पादनतंत्रांचा उपयोग करण्यासहि त्यांनीं शिकलें पाहिजे. भारतानें आपल्या औद्योगिक साधनसंपत्तीविषयीं केलेला अंदाज वाजवीपेक्षा फारच कमी केलेला आहे. लोखंड व कोळसा ह्यांचे साठे विपुल आहेत. त्याचप्रमाणें येथील कामगारांचें हस्तकौशल्यहि नजरेंत भरण्यासारखें आहे. अमेरिकेंत संशोधन इतकें त्वरेनें होत आहे कीं त्यामुळें उत्पादन-तंत्रांत झपाट्यानें बदल घडून येत आहे. अमेरिकेंतील कारखानदार दरवर्षी सुमारें ४०० कोटी डॉलर्सची रकम औद्योगिक संशोधनावर खर्च करतात. नव्या नव्या शोधांमुळें अमेरिकेंतील तरुण लोकांना रोजगार मिळण्याची अधिक संधि प्राप्त होत आहे. भारतीय उद्योगपतींनीं नवनवीन प्रकारचा माल बनवून तो बाजारपेठेंत स्वस्ताईनें विकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परदेशी गुंतविण्यास मोकळें असें भांडवल अमेरिकेंत आहे का? असा प्रश्न विचारण्यांत आला असतां तसें मुबलक भांडवल असल्याचें ते म्हणाले.

## कोइमतूर येथील ऊंसविषयक संशोधन-संस्था

कोइमतूर येथील शुगरकेन ब्रीडिंग इन्स्टिटयूट ह्या संस्थेसाठी एक नवी इमारत बांधण्यांत येणार आहे. ह्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ भारताचे अन्न व शेतकी-मंत्री श्री. आजितप्रसाद जैन ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. इमारतीचा उपयोग उसाच्या लागवडीविषयीं संशोधन करण्यासाठी करण्यांत येणार आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. जैन म्हणाले कीं, भारतांत साखरेचा धंदा हा एक मोठा धंदा आहे. गुळाचा धंदा ग्रामोद्योगाच्या स्वरूपांत आहे. ह्या दोन्ही धंद्यांमुळें ग्रामीण भागांतील शेंकडों लोकांना रोजगार प्राप्त होतो. त्याशिवाय साखरेच्या व गुळाच्या व्यापारांतहि अनेक लोक गुंतलेले आहेत. अर्थातच साखरेचें व गुळाचें उत्पादन वाढल्यास हजारों लोकांना त्याचा फायदा मिळेल. म्हणून साखरेचें व गुळाचें अधिक उत्पादन करण्यासाठी हल्लींपेक्षा कमी जमीन कशी लागेल ह्यासंबंधींचें संशोधन कोइमतूर येथील संशोधन संस्थेनें केलें पाहिजे.

भारतांत दर एकरीं उसाचें उत्पादन अवघें १४ टन होतें. तेंच ऑस्ट्रेलियांत २५ टन होतें आणि इंडोनेशिआंत ४० टन होतें. दर एकरीं होणाऱ्या उत्पादनांत भारताला वाढ करावयाचीच आहे. पण उसांतील साखरेचें प्रमाणहि अधिक वाढविण्याचे प्रयत्न करणें जरूर आहे. देशांच्या निरनिराळया भागांतील हवामानांत येऊं शकतील अशा प्रकारच्या उसाच्या नव्या जातीहि शोधून काढल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें रोगांला बळी न पडणाऱ्या उसाचेंहि संशोधन झालें पाहिजे. गेलीं ४० वर्षे कोइमतूर येथील संस्था ह्या बाबतींत उपयुक्त कार्य करीत आहे. कोइमतूर येथें संशोधन झालेल्या कांहीं उसाच्या जाती परदेशांतहि गेल्या आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. इजिप्तमध्यें कोइमतूरच्या उसानें आतां जावा उसाची जागा पटकावली आहे. कोइमतूर येथील ऊंस जगांतील बऱ्याच देशांतून लावण्यांत येत आहे. तथापि आतां आणखी नवाच प्रश्न उपस्थित झाला आहे. माझी अशी माहिती आहे कीं, कोइमतूर येथें तयार करण्यांत आलेल्या उसाच्या जातींपैकीं कांहीं महत्त्वाच्या जाती कांहीं वर्षांनंतर नीट येत नाहींत. तेव्हां संशोधकांना अशा जातीच्या जागीं नवीन जात शोधून काढणें जरूर आहे.

गेल्या वर्षी सरकारनें उसाच्या पिकाची सुधारणा करण्यासाठी मोहीम सुरू केली होती. हा प्रयोग १७५ एकर जमिनींत करण्यांत आला होता, आणि त्यांत एकरीं २६ टन उसाचें उत्पादन झालें. ह्यावरून असें दिसतें कीं भारतांत उसाचें दर एकरीं उत्पादन वाढविणें शक्य आहे. लवकर पिकणाऱ्या व उशिरा पिकणाऱ्या उसाच्या जाती शोधून काढणें हीहि एक महत्त्वाची संशोधनाची बाब आहे. परंतु संशोधनासाठी जरूर त्या सोयी आणि प्रयोगशाळा ह्यांची गरज आहे. कोइमतूर येथें नव्यानें स्थापण्यांत येत असलेली संशोधनसंस्था उसाच्या व साखरेच्या धंद्याला उपयुक्त मदत करील असें मला वाटतें. कोइमतूर येथें उभारण्यांत येणाऱ्या संशोधन संस्थेच्या इमारतीसाठी सुमारें ६॥ लाख रुपये खर्च येईल.

---

**मध्य प्रदेशांत 'टालकम' सांपडलें**—भिलई येथें काढण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्याच्या भागांत 'टालकम' हें खनिज विपुल प्रमाणांत सांपडलें आहे. रशिअन तज्ज्ञ लोखंडाचा शोध करीत असतां त्यांना हा दुसराच शोध लागला. ह्या धातूचा उपयोग सौंदर्यप्रसाधनाच्या धंद्यांत करण्यांत येतो.

## डायरेक्टर बोर्डाच्या सेक्रेटरीचीं कामें

### बोर्डाच्या सभेची पूर्वतयारी

(१) जरूरीप्रमाणें सभेच्या नोटिसा पाठविणें. ठराविक मुदतीनें सभा भरत असतील, तर नोटिसांची आवश्यकता ठेवत नाहींत. सभेंत विशेष एकादा विषय निघणार असेल, तर मात्र नोटीस जरूर पाहिजे. कंपनीच्या आर्टिकल्समध्यें नोटीस किती दिवसांची हवी हें सांगितलेलें नसेल, तर नोटीस सभेपूर्वी योग्य मुदतींत धाडली पाहिजे.

(२) सभेची कार्यक्रमपत्रिका ( अजेंडा ) तयार करणें. नोटिसीबरोबर अजेंडा पाठविणेची पद्धत आहे; कधींकधीं नोटिसीच्या कागदावरच अजेंडा लिहिण्यांत येतो. दोन सभांच्या मधील काळांत घडणाऱ्या गोष्टींचीं टिपणें करून त्यांपैकीं कोणत्या बाबींचा विचार बोर्डाच्या सभेंत व्हावयास पाहिजे, हें सेक्रेटरी, चेअरमनला विचारून ठरवितो.

(३) डायरेक्टरांना ज्यांची उपस्थिति आवश्यक वाटण्याचा संभव आहे, असे कंपनीचे अधिकारी, ऑडिटर्स, सॉलिसिटर्स, इत्यादि सभेच्या वेळीं हजर ठेवणें.

(४) जरूर पडणारा पत्रव्यवहार व कागदपत्रें तयार ठेवणें. प्रत्येक डायरेक्टरासमोर लेखनाचें साहित्य मांडून ठेवलें आहेना, हें पहाणें.

### बोर्डाची सभा चालू असतांना

(१) उपस्थित असलेल्या प्रत्येक डायरेक्टराची हजेरीबुकांत सही घेणें.

(२) पूर्वीच्या सभेचा वृत्तांत ( मिनिट्स ) वाचणें व त्यास मान्यता मिळाल्यावर, त्याचेवर चेअरमनची सही घेणें.

(३) झालेल्या कामाचीं टिपणें घेणें. मंजूर झालेले ठराव व पार पाडावयाच्या सूचना, नीट लिहून घेणें.

### बोर्डाची सभा संपल्यावर

(१) डायरेक्टरांच्या सूचना अंमलांत आणणें, चेअरमनच्या मंजुरीसाठी मिनिट्सचा कच्चा खर्डा तयार करणें, मिनिटबुकांत तीं लिहिणें.

---

### पगारवाढीसाठी लंगोटीचा धाक

दिल्लीमधील तिसऱ्या वर्गाच्या सरकारी कारकुनांपैकीं ५,००० कारकुनांनीं आपल्या पगारांत वाढ व्हावी अशी मागणी केली आहे. त्यांची मागणी पुरी होईपर्यंत त्यांनीं खालील अनुक्रमानें कमी कमी कपडे घालून कचेऱ्यांत जाण्याचें जाहीर केलें होतें.

१६ ऑगस्टः—शर्टचा व दाढीचा त्याग. विजारी व गंजिफ्राक घालणार.

२२ ऑगस्टः—विजारीऐवजीं पायजमे घालणार.

३० ऑगस्टः—पायजम्याऐवजीं कच्छ घालणार व अनवाणी जाणार.

५ सप्टेंबर ते १० सप्टेंबरः—फक्त लंगोटी व चादर वापरणार.

---

### इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण

इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतरच्या पहिल्या महिन्यांत, म्हणजे जुलै १९५५ मध्यें, इंपीरिअल बँकेच्या १,८६५ भागदारांनीं नुकसानभरपाईची मागणी केली तिची रक्कम २·२१ कोटी. रु. भरली.

## सोसायटयांच्या शिलकेची जबाबदारी कोणावर ?

**( लेखक : " आणखी एक सहकारी " )**

सहकारी सोसायट्यांच्या कारभारासंबंधीं अलिकडे बरेच लेख "अर्थ" साप्ताहिकांत प्रसिद्ध करून या संस्थांना दैनंदिन कारभारांत येणाऱ्या अडचणी चव्हाट्यावर मांडण्याचा उपक्रम या वृत्तपत्रानें केल्याबद्दल त्याच्या संपादकांचें अभिनंदन करणें जरूर आहे. असो.

सोसायट्यांना अलिकडे जाणवूं लागलेली एक महत्त्वाची अडचण जनतेपुढें मांडण्याचे हेतूनें आम्ही आमचे विचार यापुढें देत असून त्यास आमचे दृष्टीनें सुचणारे इलाजहि सुचविले आहेत.

मुंबई राज्यांतील बहुसंख्य सोसायट्या ग्रामीण असून त्यांचा कारभार स्थानिक पुढारी आपापल्या कुवतीप्रमाणें चालवीत असतात. प्रत्येक संस्थेचा दैनंदिन कारभार तिची पंचकमिटी पहात असते; व तिचे दप्तरी काम व कीर्द, खतावणी वगैरे पुस्तकें लिहिण्याचें काम तिचा पगारी सेक्रेटरी पहात असतो. पुष्कळशा सोसायट्यांना आपल्या सेक्रेटरींना योग्य तो पगार देण्याची ऐपत नसल्यानें कित्येक ठिकाणीं ग्रुप-सेक्रेटरीकडे हें दप्तरी व पुस्तकें लिहिण्याचें काम सोंपविण्यांत येत असतें. हे ग्रुप-सेक्रेटरी कोठल्यातरी एका मध्यवर्ती खेड्यांत राहतात व आसपासच्या सोसायट्यांचें काम करतात. प्रत्येक सोसायटयांची पंचकमिटी आपल्यापैकीं एकास चेअरमन म्हणून निवडते व तो इसम दैनंदिन कारभार पहाणारा श्रेष्ठतम अम्मलदार आहे असें समजलें जाते. चेअरमन याचे निश्चित अधिकार कोणते व त्याच्या निश्चित जबाबदाऱ्या कोणत्या, यावद्दल सोसायटयांच्या पोट-नियमांत तरतूद असल्याचें दिसत नाहीं. ग्रुप-सेक्रेटरी किंवा स्वतंत्र सेक्रेटरी यांचीं कामें कोणतीं याचा कांहीं कांहीं पोट-नियमांत खुलासा असल्याचें दिसतें. परंतु त्याच्या निश्चित जबाबदाऱ्या कोणत्या, त्याबद्दल मात्र कोठेंहि स्पष्ट खुलासा असल्याचें दिसत नाहीं. याबाबत मुंबई सहकारी सोसायटयांचा कायदा, त्या कायद्याखालील कानू, वगैरे मध्येंहि कांहींच तरतूद दिसत नाहीं. कीर्दीवर नेहमीं चेअरमन व सेक्रेटरी यांच्या सह्या झालेल्या असतात. परंतु हातांतील शिल्लक कोणाजवळ आहे त्याचा स्पष्ट खुलासा कीर्दींत नमूद केलेला नसतो. त्यामुळें सदर शिल्लकेबद्दल कोण जबाबदार आहे तें समजणें शक्य होत नाहीं अशी सर्वसाधारण परिस्थिति आहे.

नागरी सहकारी संस्थांची परिस्थिति मात्र यापेक्षा थोडी वेगळी असते. या संस्थांना आपलीं पुस्तकें लिहिणें, दप्तरीकाम करणें, वगैरेसाठीं एकापेक्षा जास्त नोकर नेमावे लागतात व मग स्वाभाविकच त्या प्रत्येक नोकराचे, तसेंच संस्थेचे चेअरमन, व्हाइस चेअरमन, वगैरेंचे अधिकार काय काय आहेत व त्यांच्यावर कोणकोणत्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत यावद्दल त्यांचे पोटनियमांत अगर नियमांत तरतूद केलेली असते.

ज्या संस्थांनीं आपल्या पोटनियमांत अगर नियमांत वरीलप्रमाणें निश्चित योजना केलेली नसते, त्यांचे बाबतींत (अशा संस्था म्हणजे ग्रामीण सोसायटया होत.) बऱ्याच अडचणी येतात असें अनुभवास येऊं लागलें आहे. अशा संस्थांची शिल्लक अदृश्य झाली अगर पहावयास मिळाली नाहीं तर ती कोणाजवळ आहे असें समजावें, त्या शिलकेची मागणी कोणाकडे करावी व त्याबद्दल कायदेशीर दृष्टीनें कोणास जबाबदार धरावें असे प्रश्न अलिकडे बरेच ठिकाणीं उत्पन्न झाल्याचें प्रस्तुतचे लेखकास माहीत आहे. या शिलकेबद्दल कीर्दीवर सह्या करणारे इसम म्हणजे चेअरमन व सेक्रेटरी हे दोघे वेगवेगळे अगर संयुक्तपणें जबाबदार आहेत, असें मानण्यांत येत असे व त्या दोघांवर कायदेशीर इलाज (फौजदारी अगर दिवाणी) योजले जात असत. परंतु अशा बाबतींत अलिकडे दिल्या गेलेल्या कायदेशीर निकालावरून असें वाटूं लागलें आहे कीं, या शिलकेची जबाबदारी चेअरमन व सेक्रेटरी यांचेवर जतीमतीनें आहे असें धरून चालणें चुकीचें आहे. शिलकेची जबाबदारी विशिष्ट एक किंवा अधिक इसमांची अगर अधिकाऱ्यांची आहे असें स्पष्टपणें जोंपर्यंत शाबीत होऊं शकत नाहीं तोंपर्यंत त्या रकमेची कायदेशीर जबाबदारी कोणावरहि येऊं शकणार नाहीं. ही परिस्थिति अत्यंत विचित्र व असमाधानकारक आहे असेंच मानावें लागेल. एवढेंच नव्हे तर त्यामुळें अनेक संस्थांना यापुढें आर्थिक नुकसानीहि सोसावी लागेल अशी भीति वाटते.

सबब याबाबत आमची अशी सूचना आहे कीं, सोसायटी-जवळ असणाऱ्या शिलकेची जबाबदारी कोणावर राहील यासंबंधीं सरकारनें एक कानू मंजूर करून त्याची अम्मलबजावणी तावडतोब सुरू करावी. कोणत्याहि संस्थेच्या पोटनियमांत शिलकेसंबंधीं स्पष्टपणें खुलासा केला नसेल तर त्या संस्थेजवळ असणाऱ्या शिलकेची जबाबदारी तिचे चेअरमनवरच राहील, इतरांवर नाहीं, अशा अर्थाचा हा कानू असावा अशी आमची सूचना आहे. या सूचनेचा सरकारनें शक्य तितक्या लवकर विचार करावा अशी त्यास आमची आग्रहपूर्वक विनंती आहे.

---

### मद्रास राज्यांतील सहकारी चळवळ

मद्रासच्या सरकारनें ३० जून, १९५४ अखेर संपलेल्या वर्षांतील सहकारी संस्थांच्या कार्याचा आढावा प्रसिद्ध केला आहे. मद्रास राज्यांतून आंध्र-राज्य स्वतंत्र करण्यांत आल्यावर मूळच्या मद्रास राज्यांतील तीन केंद्रीय सहकारी संस्थांची दोन राज्यांत वाटणी करावी लागली. अहवालाच्या वर्षी मद्रास राज्यांतील सहकारी संस्थांची संख्या १,४५४८ वरून १४,८९५ वर आली. सभासदांची संख्या २५·४१ लाख होती ती २६·२२ लाख इतकी झाली. त्याचप्रमाणें वसूल भांडवलाची रक्कम ८२१·७९ लाख रुपयांवरून ९७२·९१ लाख रुपयांवर आली. सर्व सहकारी संस्थांचें मिळून खेळतें भांडवल ६२ कोटी रुपये भरलें. भांडवलांत झालेली वाढ शेतीविषयक पतीच्या संस्था, लँड मॉर्टगेज बँक्स, बाजारविषयक सहकारी संस्था, दूधपुरवठा करणाऱ्या संस्था, घाऊक स्टोअर्स, विणकरांच्या संस्था आणि सहकारी घरबांधणीच्या संस्था ह्यांच्या संख्येंत वाढ झाल्यामुळें झाली. मद्रास राज्यांतील सहकारी संस्थांत स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक ही संस्था अगदीं वरच्या टोंकाला आहे. तिच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या १६ सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक्स आहेत. स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेजवळ ३·९ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. त्यापैकीं १·९४ कोटी रुपयांच्या ठेवी सहकारी संस्थांच्याच होत्या. १६ डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँकांचे मिळून १४,०८५ सभासद होते. त्यांचें भाग भांडवल ९४·३८ लाख होतें आणि खेळतें भांडवल १२·१० कोटी रुपये होतें.

---

**निझामसागर येथील धरण**—निझामसागर येथील विद्युत्-केंद्रासाठीं बांधण्यांत येत असलेल्या धरणाचें काम पुरें होत आलें आहे. विद्युतकेंद्रासाठी २२५ लाख रुपये खर्च येणार असून त्यांत तीन जनरेटर्स बसविण्यांत येणार आहेत.

## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव

## नोटीस

नोटीस देण्यांत येतें कीं, बँकेच्या भागीदारांची वार्षिक साधारण सभा बुधवार तारीख २८ सप्टेंबर रोजीं जळगांव येथें सकाळीं ८ ते ११ व दुपारीं १ वाजल्यापासून पुढें नटवर थिएटरमध्यें भरेल व त्यांत पुढील कामें होतील.

१. श्री. चेअरमनसाहेब यांचें प्रास्ताविक भाषण.

२. सन १९५४–५५ सालचा अहवाल, ताळेबंद व हिशेब मंजूर करणें.

३. भागांवरील नफा व डिव्हिडंड किती द्यावयाचा तें ठरविणें व सन १९५४–५५ सालचे नफ्याची वांटणी मंजूर करणें.

४. लोकल ऑडिटर व सरकारी ऑडिटर यांचे ऑडिट-मेमोचा विचार करणें.

५. नियमाप्रमाणें डायरेक्टरांच्या चार जागा रिकाम्या होतील, त्या जागीं नवीन डायरेक्टर्स निवडणें. सोसायटयातर्फे श्री. एकनाथराव संपतराव पाटील, श्री. दाजीबा फकीरा पाटील, श्री. वामनराव व्यंकटराव पाटील, आणि अजबसिंग लालसिंग पाटील हे डायरेक्टर्स निवृत्त होतील व ते पुन्हां निवडून येण्यास पात्र राहातील.

६. १९५५–५६ सालाकरितां चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडणें.

७. सोबत दाखल केल्याप्रमाणें पोटनियम दुरुस्तीबद्दल विचार करणें.

८. पोटनियमाप्रमाणें कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणें.

९. श्री. चेअरमनसाहेब यांचे आगाऊ परवानगीनें आयत्या-वेळीं पुढें येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

टीप—बँकेस जोडलेल्या प्रत्येक सोसायटीस वरील सभेकरितां फक्त एक प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क आहे. मात्र सदर प्रतिनिधीकडे सोसायटीचें तहकुबी न मिळालेलें थकबाकीचें कर्ज येणें नसलें पाहिजे व त्याबद्दल असें कर्ज येणें नाहीं असा त्यांनीं सोसायटीकडून दाखला पाठविला पाहिजे. अशा प्रतिनिधींचा ठराव व दाखला सोसायटीचे चेअरमन व सेक्रेटरी यांचे सह्यानिशीं सोसायट्यांनीं बँकेचें जळगांव येथील हेड ऑफिसकडे ता. २१ सप्टेंबर १९५५ रोजीं अगर तत्पूर्वी मिळतील अशा रीतीनें पाठविलें पाहिजेत. ज्या सोसायट्यांकडून प्रतिनिधींचे ठराव व दाखले बँकेच्या जळगांव हेडऑफिसमध्यें ता. २१ सप्टेंबर १९५५ रोजीं अगर तत्पूर्वी पोहोंचतील, त्या प्रतिनिधींनाच फक्त डायरेक्टरांचे निवडणुकीला मतें देण्याचा हक्क राहील. भागीदार सहकारी संस्थांचे प्रतिनिधि व भागीदार यांनीं सभेस हजर राहावें अशी विनंती आहे.

डायरेक्टर्सचे जागांसाठी उमेदवारांचीं नांवें ता. ७ सप्टेंबर १९५५ पावेतों जळगांव येथें प्रसिद्ध करण्यांत येतील. मतें नोंदणीस ता. २८ सप्टेंबर १९५५ रोजीं दुपारीं एक वाजतां सुरुवात होईल.

सूचनाः—ता. २१ सप्टेंबर १९५५ पर्यंत आमचें जळगांव ऑफिसांत कळविण्यांत आलेल्या विषयांचीच मात्र माहिती सभेच्या वेळीं विचारतां येईल.

जळगांव, पू. खा. ज्ञुलालसिंग शंकरराव पाटील.
२३–८–१९५५ चेअरमन,
पू. खा. सें. को. ऑ. बँक लि. जळगांव


५० | वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. इजीव, ३० शुक्रवार पेठ, पुणें —




## घरें बांधण्यासाठीं आर्थिक साहाय्य
### नियम प्रसिद्ध झाले

"लो इन्कम ग्रुप हौसिंग" योजनेखालीं घरें बांधण्यासाठी लोकांना कर्जे देण्यासंबंधींचे नियम मुंबई सरकारनें तयार केले आहेत.

सुरुवातीला हे नियम राज्यांतील म्युनिसिपालिटींच्या हद्दींत लागू करण्यांत येतील व सरकारला आवश्यक वाटेल त्यावेळीं ते इतर भागांनाहि लागू करण्यांत येतील.

या नियमांनुसार बांधण्यांत यावयाच्या गाळ्याच्या अंदाजे खर्चाच्या ७० टक्के इतके किंवा ज्या जमिनीवर गाळा बांधावयाचा असेल त्या जमिनीची रोकडी खरेदी करण्यांत आली असेल तर अशा बाबतींत त्या जमिनीच्या खरेदीची प्रत्यक्ष किंमत व तीवर बांधावयाच्या गाळ्याचा अंदाजी खर्च यांच्या ७० टक्के इतकें कर्ज देण्यांत येईल. मात्र हें कर्ज अर्जदार पुढें दिलेल्या उत्पन्नाच्या ज्या गटांत बसत असेल त्या गटासाठीं ठरविण्यांत आलेल्या कमाल रकमेपेक्षा जास्त असणार नाहीं.

वार्षिक २४०० रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा गट (रु. ५,००० ), रु. २४०१ ते ३६०० पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा गट (रु. ६,००० ); रु. ३६०१ ते रु. ४८०० पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा गट (रु. ७००० ); आणि रु. ४८०१ ते रु. ६,००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा गट (रु. ८,००० ). ज्या इसमाचें वार्षिक उत्पन्न रु. ६,००० पेक्षा अधिक असेल त्याला कर्ज देण्यांत येणार नाहीं.

हें कर्ज अर्जदाराला स्वतःला राहण्यासाठीं फक्त एक गाळा बांधण्यासाठींच देण्यांत येईल.

ज्या इसमाचा स्वतःच्या मालकीचा अथवा त्याच्या कुटुंबांतील इतर व्यक्तींसह समाईक मालकीचा गाळा असेल अशा इसमाला सदरहू योजनेखालीं कर्ज मिळण्यास पात्र समजण्यांत येणार नाहीं.

हें कर्ज व्याजासह ऋणकोच्या मर्जीप्रमाणें १०, २० अथवा ३० सारख्या वार्षिक हप्त्यांनीं फेडावें लागेल. १० वर्षांत फेडावयाचे कर्जावर ५ टक्के, २० वर्षांत फेडावयाच्या कर्जावर ५¼ टक्के आणि ३० वर्षांत फेडावयाच्या कर्जावर ५½ टक्के व्याज आकारण्यांत येईल.

कर्ज तीन हप्त्यांनीं देण्यांत येईल. जमिनीचा ताबा घेतल्यावर २० टक्के, गाळ्याला जोतें घालून झाल्यावर ५० टक्के आणि छप्पर वगैरे घालण्याच्या सुमारास उरलेलें ३० टक्के कर्ज देण्यांत येईल.

ऋणकोनें गाळ्याच्या बांधकामासाठीं केलेल्या खर्चाचा बिनचूक आणि खराखुरा हिशेब ठेवला पाहिजे आणि जिल्ह्याचे कलेक्टर ठरवितील त्या फॉर्ममध्यें व ते ठरवितील त्या तपशिलासह त्याबाबतचे तक्ते प्रत्येक तिमाहीस अथवा कलेक्टर ठरवितील त्या मुदतीप्रमाणें त्यांच्याकडे सादर केले पाहिजे.

कर्जासाठीं ठराविक फॉर्मवरील अर्ज ज्या जिल्ह्यांत गाळा बांधावयाचा असेल त्या जिल्ह्याच्या कलेक्टरांकडे केले पाहिजेत. या नियमांच्या प्रती व अर्जांचे फॉर्म जिल्ह्याच्या कलेक्टरांकडे मिळूं शकतील. तसेंच गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, चर्नीरोड, मुंबई येथेंहि अनुक्रमें तीन आणे व एक आणा किंमत देऊन मिळूं शकतील.

सहकारी घरबांधकाम संस्था, सहकारी भाडेकरू सोसायट्या, सरकारमान्य शिक्षणसंस्थों आणि इस्पितळें, शैक्षणिक विश्वस्त निधि, धर्मादाय संस्था, यांना अशीं कर्जे देण्यासंबंधींचे नियम करण्यांत येत आहेत.

### युनायटेड नेशन्समधील नोकरवर्ग

युनायटेड नेशन्सच्या कचेरींत पुरेशा भारतीयांना नोकरी देण्यांत आलेली नाहीं; विशेषतः वरिष्ठ जागांवर फारच कमी भारतीय आहेत, अशी तक्रार भारत सरकारनें कित्येक वेळां केलेली आहे. युनायटेड नेशन्सच्या सेक्रेटरी जनरलनीं, त्यांच्या कचेरींत सर्व देशांना योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळालेलें नाहीं, हें मान्य केलें आहे. पण, १० वर्षांपूर्वी कचेरी सुरू केली त्यावेळीं नेमलेले नोकर काढून टाकतां येत नाहींत व त्यामुळें नव्यांना जागा मिळणें कठीण जातें, असें ते म्हणाले.

---

### हातानें काड्यापेट्या तयार करण्याचें केंद्र

सहकारी खात्याचे मंत्री श्री. म. पु. पाटील यांनीं दि. २१ रोजीं पुणें जिल्ह्यांतील पिरंगुट येथें हातानें काड्यापेट्या तयार करण्याच्या केंद्राचें उद्घाटन केलें. मुळशी सर्वोदय योजनेचे संचालक श्री. जी. ए. देशपांडे यांनीं हें केंद्र सुरू केलें असून, या आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या भागांतील गरजू शेतकऱ्यांना पूरक उत्पन्नाचें साधन उपलब्ध व्हावें म्हणून हें केंद्र सुरू करण्यांत आलें आहे.

---

### झाडूवाल्यांना बढत्या

यापुढें मुंबई राज्यांतील सरकारी इस्पितळें, दवाखाने आणि प्रसूतिगृहें यांत होणाऱ्या वॉर्ड नोकरांच्या जागा त्याच संस्थांतील झाडूवाल्यांची बढती करून भरण्यांत येतील. मात्र यासाठीं सदरहू जागांबाबतच्या आवश्यक त्या अटी झाडूवाल्यांनीं पुऱ्या केल्या पाहिजेत.

---

### स्टेट बँकेवर श्री. भिडे ह्यांची नेमणूक

श्री. एस्. आर. भिडे, आय. सी. एस्., ह्यांची स्टेट बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरचे जागीं नेमणूक झाली आहे. ते सध्या मध्यवर्ती सरकारच्या अन्न-शेती खात्याचे जॉईंट सेक्रेटरी आहेत. त्यांचें वय ४७ वर्षांचें आहे.

---

**राजदूतांची सोय**—नवी दिल्ली येथें परदेशीय राजदूतांच्या राहाण्यासाठी नवी वसाहत स्थापन करण्यांत येत असून तिचें नांव 'चाणक्यपुरी' असें ठेवण्यांत येईल. ह्या वसाहतींत ३०० खोल्यांची सोय असणारें मोठें हॉटेलहि बांधण्यांत येणार आहे. त्यासाठी सार्वजनिक भांडवलाची कंपनी काढण्यांत येईल व तिचें कांहीं भांडवल सरकारहि घेईल.

**मुंबई-कन्या कुमारी रस्ता**—मुंबई ते कन्याकुमारी हा रस्ता १९५८ च्या अखेर पुरा होईल. रस्त्याची ३३१ मैलांची लांबी मद्रास राज्यांत आहे. ह्या भागासाठीं राज्य सरकारला ३३२ लाख रुपये खर्च करावे लागतील. रस्त्याच्या एकूण मार्गावर ३७ मोठे पूल व १,२२३ छोटे पूल बांधावे लागतील.

**कोचीनला बोटी बांधण्याचा कारखाना**—कोचीन बंदरांत बोटी बांधण्याचा लहानसा कारखाना काढण्याची योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केली जाण्याचा संभव आहे. किनाऱ्या किनाऱ्यानें प्रवास करून व्यापार करणाऱ्या छोट्या बोटी कारखान्यांत बांधण्यांत येतील. ७,००० टन अगर त्यापेक्षा अधिक वजनाच्या बोटी विशाखापट्टम येथें बांधण्यांत येतात.

## दि सह्याद्रि इन्शुरन्स कंपनी लि., नासिक

### चौथें यशस्वी मूल्यमापन : भागीदार व विमेदार यांना नफावांटणी

दि सह्याद्रि इन्शुरन्स कं. लि., नासिकचे भागिदारांची वार्षिक सर्वसाधारण सभा तारीख १०-८-५५ रोजीं नासिक येथें कंपनीच्या मुख्य कचेरींत झाली, व सन १९५४ सालचे जमाखर्च, ताळेबंद व ३१ डिसेंबर १९५४ अखेर संपलेल्या त्रैवार्षिक मुदतीचें मूल्यमापनाचा अहवाल हें संमत करणेंत आलें.

### १९५४ मधील कामाचा आढावा

संस्थेचे अध्यक्ष खासदार श्री. स. का. पाटील, अध्यक्ष मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटी, हे उपस्थित होवूं न शकल्यानें उपाध्यक्ष श्री. एम्. जे. दीक्षित, एम्. ए., बी. एससी. रिटायर्ड कलेक्टर, नासिक ह्यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. अध्यक्षांनीं भागिदारांस उद्देशून केलेल्या भाषणांत संस्थेनें आतांपावेतों केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांत १९५४ सालीं कंपनीनें ३२ लक्ष रुपयांचें विमा-काम पूर्ण करून विमानिधींत सुमारें ६ लक्ष रुपयांची वाढ केली व आतां तो रु. ४१,८८,४१७-१२-९ इतका झाला आहे. विमाहप्त्यांचें उत्पन्न रु. ८,२६,४७५-७-१० झालें. यांपैकीं रु. १,२०,६१२-१२-९ पहिल्या वर्षाचें विमाहप्त्यांचें होतें.

१९५४ सालीं एकूण रु. ९६,०५५-८-० चे क्लेम उद्‌भवले, यांपैकी रु. २४,९३५-१२-० मृत्यूमुळें व उरलेले मुदत संपल्यामुळें उद्‌भवले होते. एकूण रु. १,१०,४३७-५-० चे क्लेम प्रत्यक्ष आदा करणेंत आले. कंपनीस लाईफ-फंडावर मिळालेल्या व्याजाचा दर शें. ३·९५ होता. भारतांत केलेल्या विमाधंद्याचा खर्च रिन्युअल हप्त्यांचे उत्पन्नाच्या शें. २०·६ इतका होता.

### मूल्यमापनांतील वाढावा

ता. ३१-१२-५४ अखेर संपलेल्या त्रैवार्षिक मुदतीचें मूल्यमापन कंपनीचे विभागणिती श्री. के. ए. पंडित, एफ्. आय. ए. मुंबई यांनीं केलें असून त्याचा अहवालहि सम्मत करणेंत आला. त्यासाठी व्याजाचा दर शें. ३½ गृहीत धरला असून खर्चाकरितां शें. २४ व २१ टक्के ची तरतूद केलेली आहे. मृत्यूमुळें झालेल्या क्लेमचें प्रमाण अपेक्षित क्लेमचें शें. ४५·७८ टक्केच होतें. यावरून विमेदारांची निवड कसोशीनें व काळजीपूर्वक होत असल्याचें दिसून येतें. मूल्यमापनांत रु. २६,७१८ चा इन्कमटॅक्स वजा जातां रु.१,९९,२०६-०-०चा निव्वळ वाढावा दिसून आला. यांतून कायद्याचे नियमानुसार शें. ९२½ म्हणजे रु. १,८४,२६६-०-० विमेदारांचे हिश्शास व उरलेले रु. १४,९४०-०-० भागिदारांचे हिश्शास देतां आलेले आहेत.

विमेदारांचे हिश्शांतून १९५२-५४ या त्रैवार्षिक मुदतीकरतां हयातीनंतरच्या नफ्यासह विम्यास दरहजारीं रु. २० व हयातींतील विम्यास रु. २४ इतकें रिव्हर्शनरी बोनस देण्याची ॲक्च्युअरीनें केलेली शिफारस संमत करण्यांत आली. भागिदारांचे हिश्शापैकीं रु. १२,२०७ प्रेफरन्स शेअरवर करमाफ डिव्हिडंडसाठी खर्च व्हावयाचे असून रु. २,५०० सामान्य स्वरूपांचे शेअर धारण करणाऱ्या भागीदारांस डिव्हिडंड देण्यासाठी उपलब्ध आहेत.

संस्थेच्या विमाक्षेत्रांतील व मुख्य कचेरींतील कार्यकर्ते यांस अध्यक्षांनीं धन्यवाद दिले, व सर्वांचें सहकार्य यापुढेंहि मिळत राहील अशी आशा व्यक्त केली.

संस्थेचे अध्यक्ष खासदार श्री. स. का. पाटील यांच्या प्रभावी नेतृत्वाचा कंपनीस लाभ झालेला आहे, त्यामुळें संस्थेचे व्यवस्थापक श्री. गो. ग. सौंदणकर मॅनेजिंग डायरेक्टर व श्री. वा. का. जोशी फायनॅन्स मॅनेजर, यांचे तत्पर व कार्यदक्ष व्यवस्थापकत्वाखाली कंपनीची उत्तरोत्तर भरभराट होत राहील. याबद्दल आम्हांस खात्री वाटते.

---

## दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाइफ इन्शु. कं. लि.

### खर्चाचें प्रमाण फक्त १२·९%, मिळालेलें व्याज ४½%

वरील कंपनीचा १९५४ सालचा वार्षिक अहवाल व जमाखर्चाचे तक्ते आमचेकडे नुकतेंच अभिप्रायार्थ आले आहेत. या वर्षांत कंपनीनें एकूण रु. ४,९०,००० किंमतीचे विमे दिले असून, प्रिमियम पोटीं रु. १,६६,९५८ जमा केले आहेत. व्यवस्था खर्च फक्त रु. २७,८५१ आहे. खर्चाचें प्रमाण मागच्या वर्षापेक्षाहि कमी म्हणजे रिन्युअल प्रिमियमच्या अवघें १२·९ टक्के ठेवून कंपनीनें आपलें या बाबतींतलें वैशिष्ट्य कायम राखलें आहे. यामुळेंच कंपनीच्या लाइफ फंडांत रु. १,३७,००० ची भर पडून आतां साल १९५४ अखेरीचा लाइफ फंड रु. ९,४६,१६५ इतका झाला आहे. या लाइफ फंडाची रक्कम सरकारी व म्युनिसिपल कर्जरोखे, सरकारमान्य कंपन्यांतील शेअर्स व डिबेंचर्स, यामध्यें मुख्यत्वेंकरून गुंतविली असून, कंपनीला मिळालेला सरासरी व्याजाचा दर ४½ टक्क्यांहून अधिक आहे. अहवालाचे सालीं क्लेमप्रीत्यर्थ देण्यांत आलेली रक्कम रु. १७,७७१ इतकी होती, आणि न दिलेल्या क्लेमच्या रकमेचा आंकडा जरी रु. १३,९११ इतका असला तरी अहवालाचे तारखेपर्यंत त्यापैकीं रु. ५,६९८ देण्यांत आल्याचें दिसून येत आहे. वरील आंकड्यांवरून कंपनीची प्रगति हळू हळू पण समाधानकारकपणें होत आहे, हेंच दिसून येतें.

कंपनीचा सदर अहवाल, विमेदारांच्या दि. २८-७-१९५५ च्या सर्वसाधारण वार्षिक सभेंत संमत करण्यांत आला. त्यावेळीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांत, श्री. भोगीलाल शहा यांनीं कंपनीची प्रगति शास्त्रशुद्ध पायावर कशी होत आहे याचें विवेचन केलें, व फाजील आशावादी न राहातां पुढच्या, म्हणजे १९५५ सालअखेरच्या मूल्यमापनांत, विमेदारांना विशेष अधिक बोनस जाहीर करतां येईल असा विश्वास प्रगट केला. चालू सालच्या सुरवातीस कंपनीनें आपले हप्त्याचे दर कमी केले असून आपलें कार्यक्षेत्रहि मद्रास व त्रावणकोर-कोचीन भागांत वाढविण्यास सुरवात केली आहे, व तिकडून नवीन कामहि मिळूं लागलें असल्याची माहिती श्री. भोगिलाल शहा यांनीं सभासदांस दिली.

कंपनीच्या येरवड्याच्या कॉलनींतील ३० प्लॉट्स आतांपर्यंत विकले गेले असून, उरलेले प्लॉट्सहि लवकरच विकले जातील असा अंदाज आहे.

या कंपनीस जबाबदारी घेऊन, व्यवहार चोख व निःस्पृहपणें पाहाणारे कार्यकर्ते लाभले असल्यामुळें, कंपनीच्या सुरक्षितेबद्दल विश्वास वाढतो. आम्हीं या महाराष्ट्रीय म्यूच्युअल कंपनीला सुयश चिंतितों.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.